
हीरक महोत्सवी साप्ताहिक

# विवेक

वैशाख शु. ५, ५११३, ८ मे २०११, ₹ १५/-

VVM/Rapatwar
Page No- 42243



# महाराष्ट्र दिन विशेषांक




# कृषी उद्योगांसाठी पायाभूत सुविधा आवश्यक -अशोक जैन


मुलाखत – किशोर कुलकर्णी

**जळगाव जिल्ह्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणारा 'जैन उद्योग समूह'. सिंचनाच्या विविध उत्पादनांची निर्मिती करणारे जैन इरिगेशन हे नाव तर सगळ्यांनाच परिचित आहे त्याशिवाय वेगवेगळ्या उत्पादनांच्या निर्मितीद्वारी उद्योग क्षेत्रात जैन उद्योग समूहाने मोलाची कामगिरी बजावली आहे. ही प्रगती साधताना सामाजिक बांधिलकीचे भान बाळगून अनेक सामाजिक उपक्रम राबविले. उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोक जैन यांची मुलाखत**

**कृषी आधारित उद्योगांची महाराष्ट्रातील स्थिती समाधानकारक आहे असे आपल्याला वाटते का?**

– महाराष्ट्राचा प्रत्येक भाग भौगोलिक विविधतेसमवेत कृषी उत्पादनाच्या विविधतेने नटलेला आहे. विदर्भात संत्री तर कोकणात हापूस व पायरी आंबा, चंद्रपूर- गडचिरोली - भंडारा जिल्ह्यात तांदूळ तर मराठवाडा व सोलापूर भागात ज्वारीचे कोठार, कुठे गहू तर कुठे द्राक्षे, डाळिंब, सीताफळ, बोरं, काजू आदी विविधता कृषी उत्पादनातही आहे. ही कृषी उत्पादनांची विविधता लक्षात घेता काही भागात निवडक कृषी आधारित उद्योग आकारास आले. व्यावसायिक व तंत्रकुशलतेच्या अभावामुळे हे प्रकल्प काही महिन्यात बंदही पडले हे मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. तसे पाहिले तर राज्यातील बहुतांश प्रकल्प बंद अवस्थेतच आपल्याला आढळतील. विदर्भातील संत्रा प्रक्रिया उद्योग बंद पडला. मराठवाड्यात प्रक्रिया केंद्र आहे कुठे? यासाठी मूलभूत ज्या सुविधा पाहिजे त्याच तेथे पूर्णत्वास आल्या नाहीत. लातूर व परिसरात ज्या काही दाल मील आकारास आल्या, त्याही कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळे तोट्यात आल्या आहेत.

खानदेशातील साखर कारखाने बंद पडले. धुळे येथे आकारास आलेला 'महाफेड'चा तेल प्रक्रिया उद्योग बंद. नाशिक येथील वाईनरी उद्योग तोट्यात आहे. बेदाणा उद्योगही धोक्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने धोक्याच्या टोकावर उभे आहेत. जो काही दूध डेअरीचा उद्योग आहे तोही पुढे सरकू शकला नाही. कृषी उद्योगासाठी आवश्यक असलेल्या मिश्र खतांचे जळगाव, बुलढाणा व नांदेड येथील कारखाने त्यांच्या क्षमतेपेक्षा कमी उत्पादन देत आहेत. पशुखाद्यनिर्मितीचा मुंबई येथील प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर आहे. राज्यात केवळ २-३ टक्के फळांवर पक्रिया



केली जाते. केळीशी संबंधित प्रकल्प नाही. सावदा येथील हा प्रकल्प बंद पडला आहे. नागपूर, वर्धा येथील सोया प्रकल्प बंद आहे. कृषीप्रक्रिया उद्योगाची ही विदारक अवस्था म्हणावी लागेल. वास्तविक पाहता वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता उत्पादित होणाऱ्या प्रत्येक कृषीउत्पादनाचा काळजीपूर्वक वापर होणे गरजेचे आहे. कृषीमालाचे आवश्यक तेवढेच उत्पादन घेण्याचे निसर्गाच्या हातात आहे. अशा परिस्थितीत जर एखाद्या कृषीमालाचे जादा उत्पादन झाले तर शेतकरी भरडला जातो. टोमॅटो, कांदा ही पिके शेतकऱ्यांना कायम हुलकावणी देणारी पिके आहेत. अशा उत्पादनांवर जर प्रक्रिया उद्योग असतील तर शेतकऱ्यांनाही याचा योग्य मोबदला मिळेल. त्यामुळे महाराष्ट्रात स्थिती फारशी चांगली आहे असे दुर्दैवाने म्हणता येऊ शकत नाही

**महाराष्ट्र या क्षेत्रात अग्रेसर होण्यासाठी आपल्याला कोणत्या दिशेने प्रयत्न करावे लागतील असे आपल्याला वाटते?**

-केवळ कृषीक्षेत्रच नव्हे तर कोणत्याही विकासाठी पायाभूत सुविधा या अत्यंत आवश्यक असतात. त्यातल्या त्यात कृषीउद्योगासाठी सिंचन व दळण-वळणाची सुविधा अत्यावश्यक बाब आहे. शेतमालाच्या वाहतुकीची सुविधा जर चांगली असेल तर शेतकऱ्यांनाही याचा योग्य मोबदला मिळेल. पुणे परिसरातील काही शेतकऱ्यांनी वेगळ्या

वाटा शोधीत यशस्वी फुलशेती करून दाखविली आहे. अनेक शेतकऱ्यांची फुले विमान वाहतुकीच्या सुविधेमुळे विदेशात पोहोचली आहेत. वाहतुकीची सुविधा ही केवळ पुण्यात उपलब्ध आहे. ती आता अपुरी पडत चालली आहे. इतरत्र या सुविधा वाढल्या पाहिजेत. येणाऱ्या काळात शेताच्या बांधावर केवळ बैलगाडी पोहोचून चालणार नाही. प्रत्येक भागात कंटेनर पोहोचू शकतील असे क्लस्टर निर्माण करून छोट्या प्रमाणातील कार्गो हब तयार करावे लागतील. शेतीला आता पाण्यासमवेत रास्त भावात विजेची गरज निर्माण झाली आहे. ओसाड व पडीक जमिनी लागवडीखाली घ्याव्या लागतील. या जमिनी नाममात्र दराने कसणाऱ्याच्या पदरात पडल्या पाहिजेत.

विदर्भ, मराठवाडा व खानदेशात कापसाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. हे लक्षात घेत या भागात कॉटन हब तयार होण्याची क्षमता आहे. यात जिनिंग, प्रेसिंग, विव्हिंग, स्पिनिंग हे एकत्र आणले पाहिजे. या प्रक्रिया केलेल्या मालाला एक्सपोर्ट सुविधा मिळणे आवश्यक आहे. याला लागणाऱ्या परवान्याचे काम सहज व सुलभ करून दिले पाहिजे. यासमवेतच शेतीला लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर द्यावा लागेल. नाला बंडिंग, फार्म पॉन्ड, वॉटर शेड, पाझर तलाव सारखी कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावी लागतील. शीतगृह, बँकांचा रास्त दरात वित्तपुरवठा व प्रक्रिया उद्योगाला कर सवलत दिली तर महाराष्ट्र नवी झेप घेतल्याशिवाय राहणार नाही. या सर्वच बाबी केवळ शासनाच्या आहेत असे नाही. गावपातळीपासून यात लोकांचाही सहभाग तेवढाच महत्त्वाचा आहे.

**कृषी आधारीत उद्योगांच्याबाबत असलेल्या शासकीय धोरणांविषयी आपले काय मत आहे?**

-कृषीक्षेत्र हे मानवी नियोजनावर कमी परंतु निसर्गाच्या हाती जास्त अवलंबून आहे. यातही भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात ठरावीक एक धोरण सर्वत्रच लागू पडेल हे सांगता येत नाही. एकट्या महाराष्ट्राचीही प्रत्येक विभागवार कृषी उत्पादकता निराळी आहे. एक मात्र खरे कृषी धोरणांमध्ये पायाभूत सुविधांवर जास्त लक्ष देण्याची गरज आहे.

**महाराष्ट्रातील फलोत्पादन व त्यावरील प्रक्रिया उद्योग अधिक चांगल्या प्रकारे वाढण्यासाठी काय करावे लागेल?**

- प्रक्रियेसाठी ज्या फळांच्या जाती आवश्यक आहेत त्या दुर्दैवाने भारतात उपलब्ध नाहीत. प्रक्रिया उद्योगांना उभे करताना यासाठी लागणारा कच्चा माल कोणता आहे, कोणत्या भागातला आहे हेही तपासून घेणे आवश्यक ठरते. फलोत्पादनाच्या बाबतीत आंबा वगळता इतर फळे ही 'टेबल फ्रूट' म्हणून अधिक सोयीची आहेत. संत्र्यावर प्रक्रिया करणारा उद्योग उभारणे सोपे आहे. मात्र आपल्या येथे ज्या संत्र्याची लागवड होते तो संत्रा प्रक्रियेसाठी उपयुक्त न ठरता 'टेबल फ्रूट' म्हणून अधिक सोयीचा आहे. यावर प्रक्रिया जरी केली तरी ते उत्पादन जास्त दिवस चांगल्या स्थितीत राहिल हे सांगता येत नाही.

राज्यातील फलोत्पादन प्रक्रिया उद्योग वाढण्यासाठी सुधारित फळांच्या वाणांची आवश्यकता आहे. याच बरोबर नवतंत्रज्ञानाची जोड याला देणे आवश्यक आहे. पाण्याची उपलब्धता व त्याचा काटेकोर वापर करण्यासाठी ठिबक सिंचन, सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान गरजेचे आहे. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी पाण्यावर अधिक दर्जेदार फलोत्पादन शेतकरी घेत आहेत.

**जैन उद्योगसमूह हा जगभर पसरलेला उद्योग समूह म्हणून ओळखला जातो. भारताबाहेर या उद्योगसमुहाने आपला विस्तार कशा प्रकारे केला?**

- कोणत्याही उद्योगाच्या वाढीसाठी गुणवत्ता हा निकष अत्यंत महत्त्वाचा असतो. जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी उद्योगाच्या उभारणीपासूनच उत्पादनातील गुणवत्तेबाबत तडजोड केली नाही. जळगावसारख्या ठिकाणाहून त्यांनी जागतिक पातळीवरची अव्वल दर्जाची पपेन पावडर निर्मिती करून दाखविली. गुणवत्तापूर्ण उत्पादन असल्याने विदेशातील ग्राहकांनी यास प्रथम पसंती दिली. गुणवत्तापूर्ण उत्पादन केवळ अद्ययावत मशिनरींवर अवलंबून असते असे नव्हे. मशिनरींसमवेत तिथे काम करणारी व्यक्तीही तितकीच चाणाक्ष व हुशार असावी लागते. आज जागतिक पातळीवर जैन यांनी वाढविलेला विस्तार हा याच गुणवत्तेच्या पायावर झालेला आहे.

कंपनीचे जगभरात २३ ठिकाणी कारखाने आहेत. जगातील पाच खंडात सात हजारपेक्षा अधिक कंपनीचे सहकारी असून ११० देशात कंपनीची विविध उत्पादने पोहोचविले जातात. जवळपास ६५०० वितरक, ९३ कार्यालये आणि ४० वेअर हाऊसद्वारे विपणन प्रणाली समृद्ध झाली आहे. ती जागतिक गुणवत्तेमुळेच!

**जैन उद्योग समूहाच्या माध्यमातून आपण कोणत्या प्रकारच्या सामाजिक उपक्रमांना जोड दिली आहे?**

कंपनीचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांचे बालपण वाकोद सारख्या छोट्या गावात गेले. अत्यंत साधारण परिस्थितीशी झगडत त्यांनी हे औद्योगिक विश्व साकार केले. खेड्यात आलेले अनुभव व नेमक्या गरजा लक्षात घेत त्यांनी सामाजिक उपक्रमांना एक दिशा दिली आहे. निसर्गाने, शेती-मातीने, समाजाने, जन्मभूमी-कर्मभूमीने आपल्याला जे दिले आहे, त्याची कृतज्ञतेने परतफेड करायलाच हवी ही भावना त्यांनी सदैव जपली. या दूरदृष्टीतूनच जैन इरिगेशनने भवरलालजी अँण्ड कांताबाई जैन मल्टिपर्पज फाऊंडेशनच्या (आधीचे जैन चॅरिटीज) माध्यमातून अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, क्रीडा, आरोग्य क्षेत्रातले अनेक उपक्रम सुरू केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी या जळगावच्याच. निरक्षरांनाही साक्षर करण्याचे त्यांचे भावविश्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने 'बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट'ची स्थापना केली आहे. या ट्रस्टमार्फत मराठी सारस्वतांना नवं दालन खुलं झालं आहे. जैन स्पोर्ट्स अॅकॅडमीमार्फत ग्रामीण भागातील खेळाडूंना मार्गदर्शनासह इतर सुविधाही उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या समग्र कार्याची मौलिकता जपणारे, जगभरातल्या गांधी अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरेल असे विश्वस्तरीय 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' कंपनीतर्फे नावारूपास आणले जात आहे. या फाऊंडेशनमार्फत ग्रामविकासाचे काम हाती घेतलेले असून शालेय विद्यार्थ्यांत गांधी विचारांचा प्रसार केला जात आहे. ❑